# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. १६/२०२० दिनांक १०/०१/२०२०**

**१)मुखेड :-** दिनांक ०८.०१.२०२० रोजी चे १७.०० वा. चे पुर्वी, कुशाल सुडके यांचे शेतात लिबांचे झाडाला यवती ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे प्रकाश शेषेराव हातमोडे, वय ३५ वर्षे, रा. माळहिवरा ता. गेवराई जि. बीड** हा बॅकेचे कर्जास व खाजगी सावकाराचे कर्ज कसे फेडावे व सतत नापीकीला व अतिवृष्टीला कंटाळुन लिंबाचे झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार सुर्यकांत शेषेराव हातमोडे, वय ४७ वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. माळहिवरा ता. गेवाराई जि. बीड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मुखेड** आ.मृ. ०१/२०२० कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास सपोनि/मगरे, मो.क्र. ८८८८९२०८३** हे करीत आहेत

**२)वजिराबाद :-** दिनांक ०९.०१.२०२० रोजी चे १३.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे घरी दुलेशानगर नांदेड येथे, यातील फिर्यादी व साक्षीदार हे विज बिलाची थकबाकी वसुली मोहिमे अंतर्गत आरोपीच्याकडील थकबाकी वसुली असल्याने आरोपीचे मिटर काढुन घेत असतांना नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी यांना मिटर कसे काय काढुन घेता म्हणुन शिवीगाळ करुन थापड बुक्याने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली व शासकीय कामात शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी धैर्यशिल गजेंद्र देशमुख, वय ४० वर्षे, व्यवसाय सहाय्यक अभियंता महावितरण कंपणी रा. महावितरण कंपणी छत्रपती चौक नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन ०८/२०२० कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४, भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोउपनि/निता कदम , मो.क्र. ८०८७०७२९१९** हे करीत आहेत.

**३)उस्माननगर :-** दिनांक ०८.०१.२०२० रोजी चे १९.०० वा.चे सुमारास, सिडको ते उस्माननगर जाणारे रोडवर मोकलेवाडी पाटी समारे कॅनोलचे जवळ ता. कंधार जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे मोहनसिंह गोविंदसिंह ठाकुर, वय ४२ वर्षे, रा. कलंबर ता. कंधार जि. नांदेड** हा यातील नमुद आरोपीचे ताब्यातील वाहन मो.सा. एम.एच.-२६/ए.जी. ५५३९ वर बसुन जात असतांना चालकाने आपले वाहन भरवेगात हयगय व निष्काळजीपणे चालवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्याद दिपेश मोहनसिंह ठाकुर, वय ३२ वर्षे, व्यवसाय खाजगी कंपणीत नौकरी रा. कलंबर बु. ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं ०२/२०२० कलम २७९, ३३८, ३०४(अ), भादंवि कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/थोरे, मो.नं. ८२०८८४१०२०** हे करीत आहेत.

**४)विमानतळ :-** ७ ऑक्टोबर, २०१६ ते दि. १२.११.२०१८ चे १८.०० वा. पावेतो, फिर्यादीचे सासरी सिडको एम.आय.डी.सी. नारेगाव बिस्मीला कॉलनी औरंगाबाद येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस माहेरहुन घरबांधकामासाठी दोन लाख रुपये घेवुन ये म्हणुन शारिरीक व मानसीक छळ करुन उपाशी पोटी ठेवुन तु माहेरहुन दोन लाख रुपये घेवुन येत नाहीस तोपर्यंत घरात राहु देणार नाही म्हणुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. व फिर्यादीस लहान मुलासह घरातुन हाकलुन देवुन फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी २३ वर्षीय महीला** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. ०९/२०२० कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवि कायदा प्रमाणे गुन्हां दाखल असून **तपास पोना/६३१ देशमुख , मो.क्र. ८६६८९४८२१९** हे करीत आहेत.

**५)बिलोली :-** दिनांक ०९.०१.२०२० रोजी चे १३.०० वा. चे सुमारास, नविन बसस्थानक बिलोली जि. नांदेड, यातील नमुद आरोपीताने संगनमत करुन फिर्यादीस ३,००,०००/-रु च्या बदल्यात १०,००,०००/-रु च्या चलणी नोटा देतो म्हणुन चिल्ड्रन बँकेच्या खेळयातील नऊ लाख सत्तर हजार रुपयाच्या नकली नोटा देवुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी शिवलिंग बाबाराव गोंगे, वय ३५ वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा.उमरदरी ता. मुखेड जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे बिलोली** गुरन. ११/२०२० कलम ४२०, ४८९, (ई) भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/केंद्रे, मो.क्र. ९८२३८८९०३७** हे करीत आहेत.

**६)देगलुर :-** दिनांक ०८.०१.२०२० रोजी चे १६.३० वा. चे सुमारास, देगलुर कोर्टासमोर देगलुर जि. नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीने Paytm kyc करण्यासा सांगुन फिर्यादीस विश्वासात घेऊन क्रेडीट कार्डाची माहिती घेवुन ४२,७००/-रु ऑनलाईन काढुन घेऊन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी याहियाखान पि. अब्दुल रहीम, वय ४८ वर्षे, व्यवसाय औषध निर्माता स. द. देगलुर रा. भायेगाव रोड देगलुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे देगलुर** गुरन. ०९/२०२० कलम ४२०, भादवि सह कलम ६६(अ)(ब)(क) आयटीॲक्टा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री धबडगे, मो.क्र. ९५५२५२०३६३** हे करीत आहेत.

**७)मुक्रामाबाद** :- दिनांक ०७.०१.२०२० रोजी चे ०८.०० वा. चे सुमारास, सुगाव कॅम्पच्या माळावर ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस मला अर्धा एकर शेत विकायचे आहे. तु विक्रीचे कागदावर सही कर असे म्हणता फिर्यादीने आरोपीस तुम्ही अगोदर शेत विकले आहे. मी आता शेत विकु देणार नाही असे म्हणताच आरोपीने फिर्यादीचे नाकावर मारुन फॅक्टचर केले व शिवीगाळ करुन थापडा बुक्यानी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सौ. सुरेखा धनाजी हेळगीरे, वय ३० वर्षे, व्यवसाय मजुरी रा. धामनगाव ता. मुखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं ०५/२०२० कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४, भादंवि कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/२००० सुरनर, मो.क्र. ७४४७२७१७२७** हे करीत आहेत.

**८)लोहा :-** दिनांक ०९.०१.२०२० रोजी चे १५.३० वा. चे सुमारास, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा लोहा जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा बँकेमध्ये पैसे काढण्यासाठी गेला असता यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे खिशातील पैसे चोरुन नेण्याचा उद्देशाने खिशात हात घालुन पैसे चोरुन घेण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी निर्गुन साहेबराव कदम, वय ३२ वर्षे, रा. धानोरा मक्ता ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे लोहा** गुरनं ०९/२०२० कलम ३७९, ५११ भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१७५४ सुर्यवंशी, मो.नं. ७०५७५२४१३४** हे करीत आहेत.

**९)हदगाव :-** दिनांक ०९.०१.२०२० रोजी चे ०१.०० ते ०३.०० च्या दरम्यान, कमलाई अपारमेंट तामसा रोड हदगाव जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा दुकान बंद करुन रात्री आठ वा. ल्हयारी येथे निघुन गेले असता बाहेर असलेले तेलाच्या दोन टॉकी ३८० किलो तेलाचे किंमती ३८,०००/-रु चे माल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी संदिप रघुनाथराव गायके, वय ३८ वर्षे, व्यवसाय व्यापार रा. ल्याहारी ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं ०९/२०२० कलम ३७९, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२३४२ हंबर्डे, मो.नं. ९२८४४२२०५२** हे करीत आहेत.

**१०)मुखेड :-** दिनांक ०८.०१.२०२० रोजी चे २१.०० ते २१.१५ वा. चे दरम्यान, वर्ताळा शिवार ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील नमुद अरोपीतांनी फिर्यादीच्या शेतातील आखाडयाजवळ थांबलेल्या मासे पकडणारे लोकांनजवळ जावुन भाजीसाठी मासे का देत नाहीस म्हणुन बेल्टने लाकडाने मारहाण करीत असतांना यातील फिर्यादीस तु आमचे भांडणात येतुस का म्हणुन बेल्टाने, लाकडाने, डोक्यात हातापयावर मारुन जखमी केले व फिर्यादीचे गळयातील अर्धा ग्रॅम सोन्याचे किंमती २०००/-रु चे पिंपळ पान जबरीने तोडुन घेतले व साक्षीदार धनराज देविदास आडगुलवाड यांचे पॅन्टचे खिशातील नगदी ३०००/-रु जबरीने काढुन घेऊन त्यांचे मासे पकडायचे जाळे किंमती १०,०००/-रु जबरीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी भिमराव पि. ज्ञानोबा गायकवाड, वय ३५ वर्षे, व्यवसाय शेती रा. वर्ताळा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं १०/२०२० कलम ३९४ भादंवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/चित्ते , मो.क्रं. ०२४६१-२२२५३३** हे करीत आहेत.

**पोलीस अधिक्षक कार्यालय**
**नांदेड.**